महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१२३९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक: डीआरए-०५२१/प्र.क्र.१९६/२०२३/जाहिरात दिनांक: ०५ ऑक्टोबर, २०२३

**-: शुध्दीपत्रक :-**

**विषय : सहायक प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक, महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक सेवा, गट-अ**

**संदर्भ : (१) जाहिरात क्रमांक - ०४८/२०२३ व ०४९/२०२३, दिनांक १ सप्टेंबर, २०२३**

**(२) शासन पत्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकीर्ण २०२२/प्र.क्र.(१५७/२२)/तांशि-१, दिनांक ०४ ऑक्टोबर, २०२३**

शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागातील तंत्र शिक्षण संचालनालयांतर्गत शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील विविध विषयांतील सहायक प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक, महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक सेवा, गट-अ या संवर्गांच्या अनुक्रमे एकूण १४९ व १०८ पदांच्या भरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दिनांक १ सप्टेंबर, २०२३ रोजी जाहिराती प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

**२.** सहायक प्राध्यापक / सहायोगी प्राध्यापक संवर्गांकरीता संदर्भिय क्रमांक २ वरील दिनांक ०४ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये कळविल्यानुसार भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या दिनांक २८ एप्रिल, २०१७ रोजीच्या अधिसूचनेतील दर्शविलेल्या Inter Disciplinary Subject अनुसार अर्हता ग्राह्य समजण्यात येत आहेत.

**३.** वरीलप्रमाणे शैक्षणिक अर्हतेमध्ये बदल/सुधारणा झाल्यामुळे, अर्हताप्राप्त उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येत असून जाहिरात क्रमांक ०४८/२०२३ आणि ०४९/२०२३ या जाहिरातींना अनुसरुन, प्रस्तुत शुध्दीपत्रकान्वये अर्ज सादर करण्याच्या प्रक्रियेस, खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज सादर करावयाचा कालावधी | दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२३ रोजी १४.०० ते दिनांक १६ ऑक्टोबर, २०२३ रोजी २३.५९ |
| २ | ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याकरीता अंतिम दिनांक | दिनांक १६ ऑक्टोबर, २०२३ रोजी २३.५९ |
| ३ | भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक | दिनांक १८ ऑक्टोबर, २०२३ रोजी २३.५९ |
| ४ | चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक १९ ऑक्टोबर, २०२३ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये |

**४.** मूळ जाहिरातीमधील वयोमर्यादा तसेच शैक्षणिक अर्हता आणि अनुभव कालावधी मूळ जाहिरातीमध्ये नमूद दिनांकानुसारच गणण्यात येईल.

**५.** जाहिरातींमधील इतर अटी व तरतुदींमध्ये कोणताही बदल नाही.

**६.** सदर शुध्दीपत्रक तसेच मूळ जाहिरात क्रमांक ०४८/२०२३ आणि ०४९/२०२३ आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

उप सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई.